MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

August 2019
Special Issue

01

MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Special Issue, August 2019

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयाअंतर्गत

राष्ट्रीय चर्चासत्र

# वैचारिक मराठी साहित्य : शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक

डॉ.देविदास खोडेवाड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors

Scanned with CamScanner

26) संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील वैचारिकता
प्रा.डॉ. सतीश प्रल्हाद घाडगे, अंबाजोगाई

27) महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य ||96
प्रा.डॉ.गिज्हे डी.पी. जालना

28) मराठी नियतकालिक वैचारिक साहित्याचा पाया || 99
प्रा. गौतम गायकवाड सर

29) दलित चळवळ आणि साहित्य : एक मागोवा ||101
डॉ. सोपान माणिकराव सुरवसे, बीड

30) विचारवंत महात्मा बसवेश्वर ||106
प्रा.डॉ.म.ई. तंगावार, लातूर

31) समाजक्रांतीकारक—महात्मा जोतिराव फुले ||108
प्रा.डॉ.असिया चिष्ती, गुंजोटी

32) म. फुले आणि हंटर कमिशन ||110
प्रा.डॉ.आहेर दिलीप किसन, नांदेड.

33) गो.ग.आगरकर यांचे शैक्षणिक विचार ||114
कु.अनुसया राजाराम इमडे, कोल्हापूर

34) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रिवादी विचार ||116
दळवी सारिका मारोती, औरंगाबाद.

35) दलित नाटकांतील आंबेडकरी विचार ||120
सोनाली लक्ष्मणराव इंगळे, औरंगाबाद.

36) मुन्नी या कादंबरीतील स्त्री लेखन ||122
अयोध्या लक्ष्मण शरणांगत, औरंगाबाद.

37) उत्तम कांबळे यांच्या साहित्यातील वैचारिकता ||124
माने रागिणी सुभाषराव , औरंगाबाद.

38) संत तुकारामांच्या साहित्यातील वैचारिकता ||126
प्रा.डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे,बीड ||128



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | August 2019 Special Issue | 0128

कितीतरी समाजातील दुर्लक्षित गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. समाजातील अनेक अंगांना स्पर्श करणारे उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरणावर देखील विपुल प्रमाणात लेखन केलेले आहे. त्यांनी आपल्या कथा संग्रहातून शोषित, पीडित, चेहरा हरवलेल्या माणसांचे चित्रण त्यांनी केले आहे. आपल्या कथातून माणसाचा मानसिक, भौतिक, वैचारिक प्रवास टिपताना ते वेगवेगळे प्रयोग करतात. उत्तम कांबळे यांच्या कथांमधून जी विविध माणसे येतात ती आपल्या समाजातल्या विविध स्तरातून येतात. त्यात प्रत्येकाचा व्यवसाय हा वेगवेगळा आहे. या कथांमध्ये तमासगीर स्त्रिया आहेत, तसेच तमासगीर बायकांवर दौलत उधळून दरिद्री झालेले अनेक पुरुष आहेत बेकार तरुण आहेत, प्राध्यापक आहेत लोकसंस्कृतीतील नंदीबैलाला घेऊन गावोगावी हिंडणारा श्रीपती आहे, खरोखरच समाजाला वाहिलेले समाजसेवक आहेत, पोलिस, इन्सपेक्टर आहेत. मानसिक विकृतींनी पछाडलेले आहेत. स्वतंत्र होऊ इच्छिणाऱ्या स्त्रिया आहेत, नवरा सोडून गेल्यावर जन्माला आलेले बाळ विकणारी आणि पुन्हा परत आणणारी, जगण्याचा संघर्ष करणारी स्त्री आहे. महारोगी, पोरांना ठार मारुन टाकणारी बाई आहे. बायकोला शिकविणारा ड्रायव्हर आहे कवी खरे आणि खोटे आहेत अश्या प्रकारची बहुविध व्यक्तीचित्रणे उत्तम कांबळे यांनी यशस्वीरीतीने साकार केलेली आहेत. अश्या प्रकारची वैचारिकता आपल्याला उत्तम कांबळे यांच्या साहित्यात दिसून येते. सामाजिक, सांस्कृतिक घडामोडीचे, ताणेबाणे उलगडून दाखवणारे लेखन करताना त्यांनी सम्यक, सकारात्मक व तारतम्यपूर्ण विचार कसा करावा हे समजते.

## संदर्भ सूची

१) उत्तम कांबळे - आई समजून घेताना, इ.स.२०१३.
२) उत्तम कांबळे - श्राद्ध, इ.स.२०१०.
३) उत्तम कांबळे - अस्वस्थ नायक, इ.स. २०१८.
४) उत्तम कांबळे - कथा माणसांच्या, इ.स. २०१५.
५) उत्तम कांबळे - कावळे आणि माणसं, इ.स. २०१५.

❑❑❑

38

# संत तुकारामांच्या साहित्यातील वैचारिकता

प्रा.डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी ता.गेवराई जि.बीड

***********

संत तुकारामांच्या साहित्यातील वैचारिकता म्हणजे संत साहित्यातील सर्वाधिक वैचारिकता आहे. त्यांचे साहित्य म्हणजे बावनकशी आत्मनिष्ठेचा प्रखर असा लेखाजोखा आहे. ना नाटकी सोंग...ना साधुत्वाचे ढोंग. अंधविश्वासांचा बडिवार नाही... सामान्यांना ठकविणाऱ्या चमत्कारांचा भडिमार नाही. आहे तो निखळ विठ्ठलभक्तीचा साक्षात्कार. ऐहिक जीवनात त्यांना ज्या अग्निदिव्यातून जावे लागते आणि अस्मानी-सुलतानी आघात सहन करावे लागले, त्या आघातांनी त्यांना संतत्व बहाल केले. तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे आघात।।

तुकाराम महाराज लोकाभिमुख संत आहेत, ते खरे लोककवी आहेत म्हणून त्यांच्या कवितेत लोकतत्वांचा आढळ मोठ्या प्रमाणात असावा, असा किती तरी अभ्यासकांचा भाबडा समज आहे. परंपरेने चालत आलेल्या जीवनसरणी प्रत्येक बाबतीत लोकतत्त्व असते किंवा असेही म्हणता येईल की, कोणत्याही काळात वावरणाऱ्या; पण मनावर परंपरेंचा गडद ठसा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तित्वाच्या घडणीत लोकतत्व असते.[१] आणि या समजुतीमुळे तकारामाचे साहित्य हे वैचारिक साहित्य आहे. संत तुकारामांच्या साहित्यात पुरोगामित्वाची साक्ष आहे. फार क्वचितप्रसंगी आशयाच्या स्पष्टीकरणासाठी, तर कधी प्रतिपाद्य विषयाला उठाव देण्यासाठी ते परंपरागत काही लोकतत्वीय घटकांचा उपयोग करतांना दिसतात; पण अखेरीस ते त्या ठिसूळ तत्वांचा धिक्कार करुन आपल्या आशय-विषयाला ठोस मूल्याचे स्वरुप देताना दिसतात.

कामनापूर्तीसाठी लोकदेवतांना नवस बोलणे, ग्रामदेवतांच्या संतुष्टीसाठी अघोरी उपाय करणे, नवस फेडणे ही लोकतत्वीय दृष्टी आहे. संत तुकाराम अशा अधम मार्गाने जाणाऱ्या सामान्यांना खडसावतात.

नवसे कन्यापुत्र होती
तरि कां करणे लागे पती।।२।।३२९

१. ग्रामीण आदिम परिसरात बुवा, भगत, मांत्रिक यांची



Scanned with CamScanner

अजही चलती आहे. भविष्य सांगणाऱ्या नि शकुनाचा कौल देणाऱ्या दाढी जटाधाऱ्यांचा भाबड्या लोकांवर प्रभाव आहे आणि या प्रवृत्तीचा तुकोबा धिक्कार करताना म्हणतात-

डोई वाढवूनि केश।
भूते आणिती अंगास।।१।।
मेळवूनि नरनारी।
शकुन सांगती नानापरी।।२।।७७०

हे ना संतजन... हे ना सज्जन, तर हे लोक मैंद असल्याचा हे निर्वाळा देतात. दगडाच्या देवास नवस करणाऱ्या आणि त्या भाबड्या लोकांना फसविणाऱ्यांचा तुका म्हणे जळो धिग् त्यांचे जिणे असा धिक्कार करतात. अनेक तीर्थांच्या स्थल महात्म्यांसंबंधी परंपरागत लोकतत्वे सामान्य माणसांच्या डोक्यात घर करुन असतात, आणि तुकोबा तर तिर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी। असल्याची ग्वाही देतात. संत तुकारामाचे साहित्य अशी समाजप्रबोधन करणारी आणि सामान्यांना उध्दाराची दिशा दाखविणारे साहित्य आहे. एका विठ्ठलाच्या पायाशी सर्व तीर्थ असल्याची साक्ष देणारी कविता आहे. विठ्ठल आणि वैष्णव हेच त्यांचे जीवप्राण. तुकाराम महाराजांची नाळ समाजाशी निगडित आहे आणि त्यांची दृष्टी लोकाभिमुख आहे; पण त्यांची भूमिका डोळस आहे, हे महत्वाचे.

तुकारामांनी पहाटेच्या भूपाळीपासून तर रात्रीच्या शेजारतीपर्यंत, लळितापासून तर गोंधळापर्यंत, गौळणीपासून तर अभंगापर्यंत लोकछंदाचा उपयोग केला. वासुदेव, जोगी, सरोदी, मलंग, मैंदू, कावडी या लोकसांस्कृतिक मागत्यांचा रुपकात्मक वापर केला आणि हुंबरी, विटीदांडू, चेंडूफळी, फुगडी, टिपरी यांसारख्या परंपरागत खेळक्रीडांचा भावभक्तीची पेरणी करण्यासाठी माध्यम म्हणून उपयोग केला, तो केवळ लोकांची नाडी.... नस पकडण्यासाठी.

परंपरा दोन प्रकारच्या असतात. डोळस आणि अंध. भाबडी आणि विवेकी. संत तुकाराम महाराज डोळस दृष्टीचे विवेकी संत असल्याने लोकोध्दाराच्या मार्गावरुन स्वतः जातात आणि सामान्यांच्या डोळ्यांत आत्मकल्याणाचे अंजन घालून त्यांना अंधश्रध्दांच्या भोवऱ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात.

संत तुकारामाचे साहित्य परंपरागत भाषेत सांगायचे तर नऊ खंड पृथ्वी आणि दहावा खंड काशीलाही पालाण घालणारी आहे. दिव्यात्मकतेचा बहाणा करुन पोकळ भावभक्तीचे बुजगावणे जसे ते भक्तिक्षेत्रात नाचवित नाहीत तसेच ते श्रध्देच्या बुरख्यात अंधश्रध्देची मानसिक भीती निर्माण करणारा बागुलबोवा उभारुन सामान्यांना भयचकित करीत नाहीत आणि चमत्कारांचा व्यक्तिमाहात्म्य वाढविण्यासाठी आधारही घेत नाहीत. अंधश्रध्दा, चमत्कार, भाबडेपणाचा त्यांनी भरपूर समाचार घेतला.

२ सेंदरी हेंदरी देवी दैवते।
कोण ती पुजी भुते केते ?

असा सवाल करणाऱ्या तुकाबांच्या साहित्यात लोकतत्वीय जाणिवांचा दुष्काळच आढळणार. जे काही लोकतत्वीय निर्देश आढळतात ते लोकजीवनाच्या स्थितिगतीचे चित्रण असते. त्यासंबंधीच्या धारणांचे पुर्ण ज्ञान तुकोबांना आहे. कधी कधी लोकतत्वीय धारणांचे समर्थन तुकोबा करताना दिसतात; पण तो वरवरचा लोकानुनय असतो, कारण तसे चुचकारल्याशिवाय इष्ट तो परिणाम साधता येत नाही.

**वैचारिक जाणिवा :**

जयाचिये द्वारी। तुळशिवंदावन।
नाही ते स्मशान। गृह जाणा ।।२।।५९

अंगणातील तुळशीवृंदावन हे एक हिंदुत्वाचे जसे लक्षण आहे तसेच घरातील गृहिणीच्या भावभक्तीचे कारणही आहे. तुळस ही पर्यावरण शुध्द राखणारी एक वनस्पती असून ती आरोग्यदायी असल्यानेच तिचे माहात्म्य परंपरेने वाढविले आणि तिचे जनत केले. औषधी वनस्पती म्हणून तिचे महत्व असल्याने धार्मिक अवगुंठण तिला दिले. वैष्णवांच्या गळा तुळशीच्या माळा आणि विठोबाच्या कृष्णरुपातील वृंदावनातील तुळशीचा लळा लक्षात घेता तुळशीचे माहात्म्य तुकोबा अधोरेखित करतात.

मृत माणसांच्या स्मृतिप्रित्यर्थ वड-पिंपळ लावण्याचा प्रघात आहे. आलिए वडपिंपळी लाऊनी असे निर्देश लीळाचरित्रातही आढळतात. पंढरपूरच्या मंदिरातील कान्होपात्रेचे प्रतीक म्हणून आजही तरटीचे झाड पूजनीय आहे. वृन्देचे प्रतीक म्हणून तुळस लावली जाते. वृंदेचे समाधिस्थल वृंदावन मानले जाते. वृंद म्हणजे समूह... पसरणे.

**केरसुणी ही मातंगी देवता :**

केरसुणी महाद्वारी।
ते मी असे निरंतरी।।२।। १७१८

संत तुकोबा स्वतःला केरसुणी मानतात नि त्याचा अभिमान बाळगतात. पंढरीत जाणाऱ्या वारकऱ्याकरवी तुकोबा विठोबाला सांगावा पाठवितात. विठ्ठला मी तुझा निस्सीम सेवक आहे. तुझ्या महाद्वाराची मी केरसुणी आहे. तुकारामांनी असे हीनत्व स्वीकारले; पण खरे पाहता त्यांनी शुद्र देवतेचे देवत्वही पत्करले आहे.

घरातील केरकचरा झाडण्यासाठी केरसुणीचा हा दैनंदिन उपयोग. ग्रामीण भागात आजही केरसुणीला पाय लावीत नाहीत. चुकून पाय लागला तर तिला नमस्कार करण्याचा प्रघात आहे. दिवे लागल्यानंतर घरातील पुंजा बाहेर फेकत नाहीत, तशीच केरसुणीही बाहेर टाकत नाहीत. तशी तिची जागा घराच्या ओसरीत नाही तर



Scanned with CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta® Peer-Reviewed International Publication
August 2019 Special Issue
0130

वळचणीखाली असते.

३केरसुणी देवतारुप आहे, अर्थात शूद्रदेवता, मंगल कार्यात सुपाबरोबर जसे तिचे स्थान आहे तसाच दृष्ट काढण्याचाही तिचा मान आहे. असे का ? मातंग समाजातील स्त्री कालपर्यंत केरसुणी झाडू-तयार करीत असे आणि घरोघर बलुतं मिळत असल्याने वितरण करीत असे. माहूरची रेणुका... एकवीरादेवी ही मूलतः मातंगी देवता आहे.

परंपरागत कथेचा थोडक्यात सारांश असा की, रेणुका वाळूचे घडे तयार करुन पतीसाठी नदीवरुन पूजेसाठी पाणी आणीत असे. जमदग्नी रुद्रावतारी तर रेणुका सत्वशील संयमी. एकदा गंधर्वांच्या जलक्रीडा पाहताना तिचे मन विचलित झाले आणि मग तिच्या हातून वाळूचा घडा काही तयार होईना. अंतर्ज्ञानी जमदग्नीने हे जाणले आणि आपल्या पुत्रास तिचा शिरच्छेद करण्याची आज्ञा केली. एका परशुरामाने या आज्ञेचे पालन केले; पण प्रसन्न झालेल्या पित्यास रेणुकेला जिवंत करण्याचे साकडे घातले. अखेर एका मातंगीचा शिरच्छेद करुन तिचे मुंडके रेणुकेच्या धडास जोडले. पूर्वीच्या मातंगी देवतेचे उन्नयन होऊन ती आज रेणुका- एकवीरा म्हणून प्रतिष्ठित झाली.

केरसुणी घर स्वच्छ करणारी शुद्र देवता का मानली जाते, याचे गूढ इथे उलगडते. ती मूलतः मातंगी देवता आहे.

**डहाका वादन : मृतात्म्यांचा जागरणविधी :**

डांका अनुशत गजरे
येऊनि अंगासी संचरे।।४।। ४१३

डांका म्हणजे डहाका. कुंभार समाजातील हे एक परंपरागत वाद्य. मृतांच्या अतृप्त वांछा... वासना आणि आत्मिक कौल जाणून घेण्याचा हा आध्यात्मिक पातळीवरचा डहाकावादन-गायन-विधी आहे. हा कुंभारांचा लोकधर्मीय विधी आहे.

खुनाचा पत्ता न लागेसा झाला म्हणजे कुंभार ही डांक वाजवितो. म्हणजे खून अंगात येतो व खुनाची हकिकत सांगतो, असा समज असल्याची टीपदेखील या विधीबद्दल शासकिय प्रतीच्या अखेरीस दिली आहे.

योगी पुरुषाच्या शरीरातील कुंडलिनी जागृत झाल्यावर जसा त्याच्या मस्तकात... सर्वांगात अनाहत नादाचा गजर उठतो, डांकावादनाने कुंभार भगताच्या अंगात जसा संचार होतो तसा विठ्ठलकृपेने तुकोबाच्या तनामनात भावभक्तीचा गजर उठतो. तुकोबांनी केवळ भावभक्तीच्या साक्षीसाठी हा वैचारिक विचार मांडला आहे.

कुसंगतीचा दुष्परिणाम....!
ढेकणाचे संगे हिरा जो भंगला
कुसंगे नाडला तैसा साधु।।१।। ३३९२

४ कुसंगतीचे दुष्परिणाम किती भयंकर असतात, हे पटवून देताना तुकोबा दृष्टांत म्हणून इतर सामग्रीबरोबर वैचारिक धारणादेखील स्पष्टीकरणार्थ नोंदवितात.

ढेकणाच्या सहवासात जर हिरा ठेवला तर अतिशय कठीण असा हिरादेखील फुटतो, भंगून जातो. तसाच साधुसुध्दा कुसंगतीने भ्रष्ट होतो. हा अभंग म्हणजे एक सुभाषित म्हणूनही समाजात रुढ आहे आणि तसा लोकसमज आहे.

वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा म्हणणारे तुकोबा अशी चूक करणार नाहीत. तुकोबांना काय अभिप्रेत असावे ?

जुन्या काळात कोकणात ढेकण नावाचे आजच्या शिकंजाप्रमाणे मजबूत पकड असणारे एक अजवार अस्तित्वात होते. या ढेकणाच्या संपर्कात जर हिरा आला तर निश्चितच तो फुटणार, हीच वस्तुस्थिती तुकोबांना अभिप्रेत असावी.

बगांड नवस....!
दगडाच्या देवा बगाड नवस
बाईल कथेस जाऊं नेदी।।१।। ३५५८

स्मशानासाठी दानधर्म करणारा अंगणात वृंदावन बांधण्याचे टाळतो. दगडाच्या देवाला बगाडाचा नवस करेल; पण बायकोला मात्र भगवद्कथा ऐकण्यास जाऊ देणाऱ्या मूढ माणसाचा समाचार तुकोबा घेतात.

हरिकथाश्रावण हा नवविधाभक्तिमार्गातील एक मार्ग आहे. बगाडाचा नवस बोलणारे... तो नवस फेडणारे, कसे वागतात याचा पाठपुरावा तुकोबा करतात. बगाड आणि बगाडाची नवसपूर्ती हा पश्चिम महाराष्ट्रातील लोक-ग्रामदैवतांच्या तुष्टीकरणाचा लोकमान्य असा विधी आहे.

बगाड म्हणजे भैरोबाचा लाकडी रथ. चैत्र महिन्यात सप्तमी, अष्टमी किंवा काही खेड्यांत दशमीला भैरोबाची यात्रा भरते. या यात्रेच्या वेळी हे बगाड उभे केले जाते. बगाडाची रचना मोठी वैशिष्ट्यपूर्ण असते. या लाकडी रथाला तीन फूट उंचीची दगडी दोन मोठी चाके असतात. याची जोडणी करताना लोखंडी खिळा, लोखंडी पट्टी किंवा इतर कोणत्याही धातूचा वापर केला जात नाही. बगाडाचा खालचा भाग बैलगाडीच्या साट्यासारखा असतो. दोन्ही चाकांना जोडण्यासाठी पाच फूट लांबीचा लाकडी कणा वापरलेला असतो. या साट्यामध्ये चार फूट लांबीची चार आडवी लाकडे वापरलेली असतात. त्यावर पाच फूट उंचीचा आणि दोन फूट जाडीचा लाकडी खांब उभा केला जातो आणि मग या खांबावर चौकोनी आकाराचा पाळणा ठेवला जातो. या पाळण्यावर तीस पस्तीस फूट लांबीचे व अंदाजे दीड फूट जाडी असलेले त्रिशुळाच्या आकाराचे लांब सरळ लाकूड आडवे ठेवतात.



Scanned with CamScanner

हा भैरोबाचा त्रिशूळ. नवसपूर्तीसाठी भैराबाची सवारी रथात बसून गावाला प्रदक्षिणा घालते. त्या त्या वर्षी मानकऱ्याचा हा मान असतो.

५ पुढे येतो देवी....!

पुढे येते देवी। तिची जती चालो द्यावी।
मागील झाडावी। झाडा मान आसडी।।१।।
एकवीरा आली अंगा। आता निवारील रोग।
माझ्या भक्तापाशी सांगा। पूजा भावे करावी ।।धृ।।
मेंढा मारावा लोवाळ। पूजा पावली सकळ।
तुम्ही केले बळ। मग मी ठायी न पडे।।२।। ४१७

खरे तर ही तिरकस शैलीतील उपरोधिक अशी खास रचना आहे आणि या रचनेत वैचारिक सामग्री खच्चून भरली आहे. लौकिक देवताना संशयाचे वावडे कसे असते, म्हणून तिची दैवी गती कशी राखावी, मेसको-मायराणीचे मेंढ्याचा बळी वगैरे लोकतत्वीय धारणा, हा या रचनेचा विशेष. इथे अर्थाचे प्रयोजन नसल्याने सरळ सरळ वैचारिक धारणांचा धांडोळा घेणे महत्वाचे ठरते.

मंत्र चळ पिसे लागते सत्वर :

मंत्रचळ पिसे लागते सत्वर
अबध्द ते फार तरले नामे।।११।। २२९४

भूतबाधा निवारण, सर्पविष उतरविणे वगैरे बाबतीत भगत, मांत्रिक आणि आरबाडी यांना अनेक प्रकारची पथ्ये पाळावी लागतात; मंत्र बिनचूक म्हणावे लागतात, पण जर का मंत्र चुकले तर ते त्यांच्यावरच उलटतात, अशा लोकश्रध्दा आहेत.

मंत्रचळ लागून वेडेपिसे झालेले आणि ताळतंत्र सुटलेले स्वैर लोकदेखील एका विठ्ठल नामस्मरणाने, जसे रामनामाने समुद्रात पाषाण तरले तसे किती तरी लोक तरले, असा संत तुकोबाचा सरळ अभिप्राय आहे.

मंत्रचळ झाल्याने मांत्रिकावर होणाऱ्या परिणामांचा विचार करता ध्युतानंदानी नादे ग्रहो दडवणेड या लीळेत भूतसृष्टी आपणास वश आहे असे सांगणाऱ्या वामदेवाची फटफजिती दाखविली आहे.

**बळी पाताळी घातला !**

बळी सर्वस्वें उदार। जेणे उभारिला कर।
करुनि काहार। तो पाताळी घातला।।५।। १३३
६

चांगल्या चांगल्या सत्वशील स्त्री-पुरुषांना दैवगतीने भयंकर आपदा सोसाव्या लागल्यात, त्यामध्ये बळीविषयीची कणव तुकोबा अभिव्यक्त करतात.

आजही दीपावली पाडव्याचा दिवस बळीराजाची आठवण म्हणून शेतकरी बलिप्रतिपदा पाळतात. बळी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी.

इडापीडा टळो बळीचे राज्य येवो।

म्हणून हाकारा पुकारा केला जातो. बळीची कथा सर्वश्रुत असल्याने त्या कथेची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही; मात्र लोकतत्वीय धारणांनी बळी आजही जिवंत ठेवली आहे.

दावलपीर स्मरताती, थेर मोरपाचे विशी। धावती भूते आविसा तैसी, ब्रीद याचे जगदीनी अशा वैचारिकतेमध्ये संत तुकारामांच्या साहित्यात जरी आढळतात तरी त्यांच्या साहित्यात चमत्कार, भुतेखेते, शकुन-अपशकुन, ग्रामदेवतांचे नवस, यात्राजत्रांतील बळीप्रथा या सर्व घटकांना नाकारुन खऱ्या भक्तिमार्गाने सामान्यांना सोबत घेऊन चालतात.

**संदर्भ सूची :-**

१. तुकाराम महाराजांची गाथा : अभंग क्रमांक विठ्ठल रुक्मिणी संस्थान देहू

२. गदिमा : साहित्य आणि लोकतत्व- डॉ.वासंती राक्षे, पृ.४ गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००३.

३. तत्रैव, पृ.७

४. संस्कृतीच्या पाऊलखुणा : द.ता. भोसले, पृ.९५-९६, पद्मगंगा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००१.

५. लोकधाटीच्या वहिवाटी : डॉ.मधुकर बाकोडे, पृ.१३, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००५.

❑❑❑



Scanned with CamScanner